(552) 15/9/23 3:45

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : १५/०९/२०२३

# प्रेसनोट

गणेश उत्सव जवळ आला असल्याने दि.१५/०९/२०२३ रोजी मा. प्रशासक तथा आयुक्त, श्री. अजीज शेख, श्री. संदीप जाधव शहर अभियंता, जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे, श्री. मनिष हिवरे सहायक सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. विनोद केणे मुख्य बाजार निरीक्षक व इतर संबंधित कर्मचारी यांच्यासोबत सेंच्युरी रेयॉन व आयडिया कंपनीजवळील गणेश विसर्जन घाटाची पहाणी करुन संबंधित अधिकारी यांना विसर्जन घाटाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवणे, घाटाचे बांधकाम व विसर्जनास येणाऱ्या भाविकांसाठी तेथील रस्ता वाहतूकीस व रहदारीस सुस्थितीत ठेवण्याचे निर्देश मा. प्रशासक तथा आयुक्त यांनी दिले.

तसेच शहरातील मुख्य रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम युध्दपातळीवर हाती घेण्यात आलेले असून त्यामधील टर्निंग पॉईन्ट येथील गोल मैदानकडे जाणारे रस्ते डांबरीकरणाने भरण्याच्या कामास सुरुवात केलेली आहे व सदर रस्त्याची पहाणी मा. प्रशासक तथा आयुक्त यांच्या मार्फत करण्यात आली.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.

मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.